**नियमित दिवाणी दावा क्रं.२५५/२००४ मधील अर्ज (नि.१५२) वरील आदेश**

वादीतर्फे दाखल अर्ज (नि.१५२), शपथपत्र (नि.१५३) व प्रतिवादीतर्फे दाखल म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादीतर्फे वकीलांचे युक्तीवाद ऐकले. कागदपत्रे तपासली.

२. वादीने प्रस्तुत अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश ६, नियम १७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेकरीता दाखल केला आहे. वादीतर्फे वकीलांनी सांगितले की, दाव्याचे प्रलंबित असताना प्रतिवादी क्रं.२ व १० यांनी दावा मिळकतीचे हस्तांतरणाचे खोटे, बनावट दस्त केलेमुळे त्याबबात दुरुस्ती व प्रतिवादी क्रं.१४ यास दाव्यात सामील करणेची, दावा कलम ३ मध्ये परिच्छेद क्रं.१ नंतर व दावा कलम ८ मध्ये ब-२ नंतर ८ब-३ अशी दुरुस्ती करण्याची दुरुस्ती करणे आवश्यक असलेमुळे वादीने अर्ज मंजुर करण्याची मागणी केली आहे.

३. प्रतिवादींनी म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्जास हरकत घेतली आहे. प्रतिवादीतर्फे वकीलांनी सांगितले की, अर्ज खरा व कायदेशीर नाही. दाव्यामध्ये वादीचा सरतपास होवुन उलटतपास सुरु झाला आहे. अर्जास कोणतेही योग्य व संयुक्तीक कारण दिले नाही. अर्ज खर्चासह नामंजुर करणेची मागणी केली आहे.

४. दावा व कागदपत्रांचे अवलोकन केले असता, प्रस्तुत दावा वादीने वाटप, मनाई व जाहीर ठरावासाठी दाखल केला आहे. प्रस्तावित दुरुस्ती ही विलंबाने केली असली तरी प्रतिवादींचे बचावावर प्रस्तावित दुरुस्तीमुळे विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाही. तसेच, सदर बाब आव्हानित करणेची प्रतिवादींना संधी उपलब्ध आहे. तसेच, दावा वाटपाचा असलेने गुणदोषावर निर्णय होणेसाठी अर्ज मंजुर करणे योग्य व उचित होईल. या सर्व बाबी विचारात घेता, खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**आदेश**

१) अर्ज (नि.१५२) मंजुर केला आहे.

२) वादीने प्रतिवादीस रुपये १००/- कॉस्ट द्यावी व ४ दिवसात दुरुस्ती करुन पुर्तता करावी.

दिनांक-१४/०१/२०१६.
पारनेर.

(सौ. ज. सं. जगदाळे)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, पारनेर